AC – 20.04.2024
Item No. – 5.4 (N) Sem I (1b)

# As Per NEP 2020

2

# University of Mumbai

| Syllabus for<br>Basket of OE | |
|---|---|
| Board of Studies in Marathi | |
| UG First Year Programme | |
| **Semester** | **I** |
| **Title of Paper** | **Credits** |
| स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी- निबंधलेखन आणि सारांशलेखन | **2** |
| **From the Academic Year** | **2024-25** |

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **Description the course:**<br><br>**Including but not limited to:** | **स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी- निबंधलेखन आणि सारांशलेखन .**<br>राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० नुसार लागू होणाऱ्या नवीन शैक्षणिक संरचनेच्या अंतर्गत अभ्यासक्रमाचे स्वरूप बहुविद्याशाखीय ( Multi- Disciplinary) आहे. त्यामुळे पदवीस्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या मुख्य विषयाची( Major course) विद्याशाखा सोडून अन्य विद्याशाखेतील कोणत्याही विषयांचा अभ्यास मुक्त वैकल्पिक म्हणजे Open Elective ( OE) या स्तंभांतर्गत करणे अनिवार्य आहे. पदवीस्तरावर प्रथम व द्वितीय अशा दोन वर्षांत प्रत्येकी दोन श्रेयांकनाच्या अभ्यासपत्रिका निवडून या स्तंभांतर्गत १०- १२ श्रेयांकने प्राप्त करणे आवश्यक आहे. वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी कला व मानव्यविद्या शाखेतील मराठी हा विषय अन्य विद्याशाखीय विषय ठरतो. हे विद्यार्थी प्रस्तुत अभ्यासपत्रिका OE स्तंभांतर्गत निवडू शकतात .<br>विविध स्पर्धा परीक्षांमधील मराठी भाषेच्या अभ्यासपत्रिकांमधे सारांशलेखन आणि निबंधलेखन या लेखन कौशल्यांचा समावेश असतो. एखाद्या विषयावर, विषयाशी संबंधित विविध बाजूंवर मुद्देसूद आणि सखोलपणे निबंध लेखन करणे ही एक कला आहे. निबंधाची संरचना तार्किकदृष्ट्या पक्की,पटण्याजोगी असावी लागते, मांडणी ओघवती असावी लागते. वस्तुनिष्ठ तपशील, विदा, माहिती, व्यक्तिनिष्ठ मते यांचे रसायन जमून यावे लागते. सारांशलेखन ही देखील एक कला आहे. विस्तृत मजकुराचा गाभा नेमकेपणाने व मुद्देसूद मांडणे, हे एक कौशल्य आहे. सारांशलेखनाचे कौशल्य शैक्षणिक क्षेत्रातच नाही तर कार्यालयीन कामकाजात, दैनंदिन व्यवहारातही आवश्यक असते. सारांशलेखनाच्या प्रक्रियेत आकलन आणि भाषिक कौशल्य या दोन्ही घटकांना महत्त्व आहे.<br>या अभ्यासपत्रिकेत निबंधलेखन आणि सारांशलेखन ही दोन्ही कौशल्ये शिकविली जाणार आहेत. त्यामुळे ह्या अभ्यासपत्रिकेतील या दोन कौशल्यांचा सराव करणे ही स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारीच असेल. |
| 2 | **Vertical:** | Open Elective |
| 3 | **Type:** | Theory |
| 4 | **Credit**: | 2 credits (1 credit = 15 Hours for Theory in a semester) |

| | | |
|---|---|---|
| **5** | **Hours Allotted:** | 30 Hours |
| **6** | **Marks Allotted**: | 50 Marks |
| **7** | **Course Objectives**:<br>१. निबंधलेखनाचे स्वरूप व त्यासाठी आवश्यक कौशल्यांचा परिचय करून देणे.<br>२. प्रत्यक्ष निबंधलेखनाची कौशल्ये विकसित करणे .<br>३. सारांशलेखनाचे स्वरूप व त्यासाठी आवश्यक कौशल्यांचा परिचय करून देणे.<br>४. सारांशलेखनाची कौशल्ये विकसित करणे. | |
| **8** | **Course Outcomes**:<br>१. विद्यार्थ्यांना निबंधलेखनाचे स्वरूप व त्यासाठी आवश्यक कौशल्यांचा परिचय होईल.<br>२. विद्यार्थी प्रत्यक्ष निबंधलेखन करण्यास सक्षम होईल.<br>३. विद्यार्थ्यांना सारांशलेखनाचे स्वरूप व त्यासाठी आवश्यक कौशल्यांचा परिचय होईल.<br>४. विद्यार्थी प्रत्यक्ष सारांशलेखन करण्यास सक्षम होईल. | |
| **9** | **Modules**:- Per credit One module can be created | |
| | **Module 1:**<br>**घटक एक:** निबंधलेखन – संकल्पना आणि उपयोजन (६० मिनिटांच्या १५ तासिका) श्रेयांकन १. | |
| | १. निबंध – संकल्पना व महत्त्व<br>२. निबंधाचे प्रकार- वैचारिक, चिंतनात्म, खंडनमंडनात्म या स्पर्धा परीक्षांमधे विचारल्या जाणाऱ्या प्रकारांवर भर आणि अपेक्षित मांडणी , भाषाशैली इत्यादी.<br>३. प्रत्यक्ष निबंधलेखन | |
| | **Module 2:**<br>**घटक दोन :** सारांशलेखन – संकल्पना, आणि उपयोजन (६० मिनिटांच्या १५ तासिका) श्रेयांकन १ | |
| | १. सारांश – संकल्पना व महत्त्व<br>२. सारांशलेखन तंत्र<br>३ .प्रत्यक्ष सारांशलेखन | |

| | | |
|---|---|---|
| **10** | **Text Books:** N.A. | |
| **11** | **Reference Books:**<br>१. व्यावहारिक मराठी, ल. रा. नसिराबादकर, भाषा विकास संशोधन संस्था, कोल्हापूर, २०२३<br>२. व्यावहारिक मराठी, प्रकाश परब, मिथुन प्रकाशन, डोंबिवली पूर्व, मुंबई, १९८९<br>३. मराठी भाषिक कौशल्य विकास , पृथ्वीराज तौर (संपा.), अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०१८<br>४. व्यावहारिक मराठी, स्नेहल तावरे (संपा.), स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे,चौथी आवृत्ती, २०११<br>५. उपयोजित मराठी, केतकी मोडक आणि इतर (संपा.), पद्मगंधा प्रकाशन, २०१२<br>६. सुगम मराठी व्याकरण, मो. रा.वाळंबे, नितीन प्रकाशन, पुणे, २०१६(एकावन्नावी आवृत्ती)<br>७. मराठी निबंध : उद्गम आणि विकास, गिरीश मोरे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००९ | |
| **12** | **Internal Continuous Assessment: 40%** | **External, Semester End Examination 60%<br>Individual Passing in Internal and External Examination** |
| **13** | **Continuous Evaluation through:**<br>Quizzes, Class Tests, presentation, project, role play, creative writing, assignment etc( at least 3 ) | **अंतर्गत चाचणी परीक्षा : २० गुण**<br>चाचणी परीक्षा (लेखी/ ऑनलाईन) / प्रकल्प/ गृहपाठ - २० गुण |
| **14** | **Format of Question Paper:** for the final examination<br>**बहिर्गत परीक्षा ३० गुण (वेळ एक तास)**<br>प्र.१ घटक क्र.१ वर आधारित अंतर्गत पर्याय असलेला प्रश्न- १५ गुण<br>प्र.२ घटक क्र.२ वर आधारित अंतर्गत पर्याय असलेला प्रश्न- १५ गुण | |

Sign of the BOS Chairman

Name of the Chairman: **Prof. Satish Kamat**

Name of the BOS: **Marathi**

Sign of the Offg. Associate Dean

Name of the Associate Dean: **Prin. Dr. Suchitra Naik**

Name of the Faculty: **Humanities**

Sign of the Offg. Dean

Name of the Offg. Dean: **Prin. Dr. Anil Singh**

Name of the Faculty**:** **Humanities**